Leadership, Education, Personality: An Interdisciplinary Journal ISSN: 2524-6178
www.sibe.rpress.co.in, Vol. 18, Issue 10 October 2023, UGC CARE 1

# नागनिकेच्या आदर्शवादी प्रशासनाची आवश्यकता: काल, आज आणि उद्या

**वर्षा भानुदास चौके (रंदई),** संशोधक विद्यार्थी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
**डॉ. गणेश चव्हाण,** संशोधन मार्गदर्शक, मराठी विभाग प्रमुख, संत गाडगे महाराज महाविद्यालय, हिंगणा, नागपूर

**प्रस्तावना**

शुभांगी भडभडे लिखित 'नागनिका' कादंबरी ही नागनिकेच्या प्रशासनाचे शकनिका प्रथम राज्यकर्ती म्हणून तिच्या व्यक्तिरेखेचे एकमेव प्रकाशित दस्तावेज आहे म्हणून तिला ऐतिहासिक कादंबरीचा दर्जा मिळाला आहे. सातवाहनांच्या कुळाची सुरुवात करणारी श्रीमुख (सिमुख) सातवाहन राजाची ती सून तर सातवाहनांचे वैभव शिखरावर नेणाऱ्या सिरी सातकर्णीची ती पत्नी होती. शक शालीवाहन संवत्सर सुरू करणारा राजा गौतमीपुत्र सातकर्णी याच कुळातील २३ वा राजा होता परंतु सातवाहनाच्या राज्याची पायाभरणी करणारे सिमुक व सिरी सातकर्णी आणि नागनिका प्रथम राज्यकर्ती ठरते ती आदर्श का? आपण इ. सन. वी पूर्व ६९ मधील क्लिओपात्राला प्रथम राज्यकर्तीचा दर्जा देतो मग तिच्या आधीच्या इ. सन पूर्व २०० वर्ष नागनिकेला का नाही? तो हक्क नागनिकेचाच आहे यासाठी नागनिकेचे प्रशासन काल आज आणि उद्या कसे आदर्शवादी ठरते याविषयी विचार मांडणार आहोत. सांकेतिक शब्द नागनिका यवन, शक, पतेनिक, जुन्नर येथील नाणेघाट, अश्वमेध व राजसूय यज्ञ इत्यादी.

**ऐतिहासिक कादंबरीचे प्रमुख निकष**

१. **ऐतिहासिक प्रामाणिकता -** ऐतिहासिक तथ्यांची योग्य मांडणी आणि कालखंडाशी सुसंगत आवश्यकता असते.
२. **कालखंडाचे चित्रण -** समाज, संस्कृती, राजकारण, धर्म, जीवनशैली यांचे तपशीलवार वर्णन हवी.
३. **काल्पनिकतेचे प्रमाण -** काल्पनिक घटना व पात्रे असली तरी ते इतिहासाशी सुसंगत असावी.
४. **भाषा व शैली -** त्या काळाशी साजेशी भाषा व संवाद शैली वापरणे आवश्यक आहे.
५. **प्रेरणा व विचार प्रवृत्ती** - कादंबरीतून देशप्रेम शौर्य संस्कृतीचे भान सामाजिक जाणीव यांचा उदय होतो का? हे महत्त्वाचे.
६. **चारित्र्य रचना -** ऐतिहासिक व्यक्तींचे व्यक्तिमत्व विश्लेषण योग्य रीतीने केलेले असावे.
७. **घटनांची मांडणी व गुंफण -** कथानक सुसंगत आकर्षक आणि शास्त्रीय पद्धतीने गुंफलेले असावे.
८. **प्रासंगिकता व संदेश -** कादंबरी आजच्या काळाशी काही संबंध साधते का? काही शिकवण देते का? इत्यादी निकषाचे पूर्णत्व ही कादंबरी देते.

१. नागनिका ही त्रणकायिर नावाच्या शक राजाची मुलगी होती. तिच्या पारंपारिकतेनुसार, संस्कृतीनुसार व संस्कारानुसार तिची रहन सहन होती. परंतु सिमुख सात वाहनांना मात्र आपली सून म्हणून सिरी सातकर्णीसाठी नागनिका आवडली होती. साम्राज्यविस्तार सीमा सुरक्षा शेजारील देशांशी मैत्री भाव ही विविध कारणे त्यासाठी होती. त्या काळात एक शक कन्येचा विवाह एका वैदिक ब्राह्मणाशी व्हावा ही केवढी वादाची व विस्मयचकीत करणारी बाब होती. सर्वधर्म समभाव हा भाग लक्षात घेतला तरी विवाहासाठी शकनिका तयार झाली हे विशेष. सिरी सातकर्णीने चिरायू अश्व पाठवून राजसूय व अश्वमेध


By : School of International Business and Entrepreneurship (SIBE)

यज्ञ केला. राज्य वैभवाला नेले. सिमुख सातकर्णी प्रमाणे सिरी सातकर्णीचा ज्वरामुळे मृत्यू अल्पवयातच झाला. यवन, शक, पतेनिक यांना सीमेबाहेर ठेवून बौद्ध, जैन या धर्मांचा आदर करून त्यांना धर्मप्रसार, धर्म प्रचारासाठी मदतीचा हात देण्याचे मौल्यवान काम सिरी सातकर्णी यांनी केले. इसवी सन पूर्व दोनशे वर्षांपूर्वी शक व ब्राह्मणांचा विवाह म्हणजे आंतरजातीय विवाह नाही तर आंतरधर्मीय विवाह ठरला.

२. नागनिकेने आपल्या तीन ते चार वर्षाच्या मुलांना राजगादीवर बसवून अमात्य सुशर्मा व लेखक विद्यानंद यांच्या सहकार्याने राज्यकारभार चालवला. सिरी सातकर्णीच्या अंत्येष्टीच्या आधीच राज्यावर आक्रमण झाले जरी ते त्यांच्या दुसऱ्या पत्नीने उषादेवींनी सत्ता लालसेने केले होते. हे आक्रमण पतीचे पार्थिव राजवाड्यात ठेवून परतवणारी राणी आदर्श नव्हे का? अशी समय सूचकता, लढवय्यी, धीराची राणी नागनिका होती.

३. राणी नागनिकेनी प्रशासन हाती घेतल्यावर अंतर्गत सुरेक्षेपेक्षा बाह्य सुरक्षेवर भर दिला म्हणून ती प्रथम प्रशासन कर्ती ठरते. उषादेवींनी आक्रमण केल्यावर अपराधी म्हणून तिला शिक्षा न ठोठावता तिला सुधारण्याची संधी दिली. बाह्य सुरक्षेसाठी अमात्यांनी ठरवलेले नियम व व्यापार व्यवस्था लावून सीमा सुरक्षा देखील केली. याच नागनिकेने पुढे स्वतःच्या पुत्रालाच शिक्षा ठोठावल्याचे संदर्भ उपलब्ध आहेत. राणी नागनिका अशी न्यायप्रिय व निरूपक्षपाती प्रशासन करती होती.

४. नागनिकीने तिच्या काळात इतिहास लेखनाला वाव दिला तो सिरी सातकर्णीपासून कादंबरीच्या सुरुवातीलाच अगदी राजा साम्राज्य विस्तार करून परतल्यावर सुरंगना व शिवदत्त हे दोघे भिकू राज्यात आले. त्यांना धर्मप्रचार व प्रसारासाठी आश्रय देऊन सातवाहनांचा एक ऐतिहासिक ताम्रपट शिलालेख तिने तयार करून सातवाहनांची वंशावळ तयार करून घेतली. जुन्नर येथील नाणेघाटात प्रस्तर लेखात कोरून ठेवले आहे. त्या प्रस्तर लेखनावरून इतिहासातील माहिती कायमस्वरूपी करून ठेवली आहे. एवढेच नाही तर बौद्ध व जैन धर्मांना आर्थिक सहाय्य सुद्धा केले.

५. व्यापाराच्या सोयीसाठी टोल टॅक्स व बँकिंगचा प्रकार त्या काळात नागनिकेनी सुरू केला. नाणेघाटात आजही दोन हाताच्या घेरात बसणार नाही एवढा मोठा दगडी घट तयार करून ये जा करणाऱ्या व्यापाऱ्यांनी करमूल्य म्हणून रेशमी वस्त्र, प्रचलित नाणे, धान्य, अलंकार इत्यादी वस्तूं टाकण्याचा प्रघात पाडला. त्यामुळे राजकोषाची वृद्धी करता आली. अवैध व्यापाराला आळा बसला.

६. व्यापारासाठी व व्यापाऱ्यांच्या सोयीसाठी चढण रस्त्यांचे बांधकाम पायदंड्या व मजबूत रस्त्यांचे निर्माण केले. व्यापाऱ्यांसाठी धर्मशाळा, पशुधनाची विशेष सोय तसेच पांथस्थांना छायेसाठी दुतर्फा झाडे लावून सावलीची योग्य सोय केली.

७. स्त्रियांच्या व्यापाऱ्याला बंदी घातली तसेच मदिरापान म्हणजेच दारूबंदी याकडे राणीच्या काळात विशेष लक्ष दिल्या गेले. मम्टशास्त्रीचा मुलगा दारूच्या नशेत धूत होतो. सामान्य जनता राजरोस मदिरापान करीत असे. खुलेआम मद्य विहार व मद्य व्यापार चालत असे. तसेच स्त्रियांची विक्री सुद्धा नागनिकेने थांबवली. स्त्रियांच्या मद्य प्राशनावर आक्षेप घेतले.

८. नागनिकेचा न्याय सुद्धा आदर्शवादी आहे. प्रशासनाची भक्कम बाजू म्हणजे न्यायदान असते. नागनिकेने उषादेवीने केलेला अपराध शांततेने समजून दिला. तिच्या बंधूंना सैन्य बाळगण्याचे स्वातंत्र्य घोषित केले. सैन्यात मानाचे पद दिले. स्त्रियांना न्याय मिळवून दिला. स्त्री विक्री व्यापारावर बंदी घालून जणू स्त्रियांची मुक्ती केली.

९. एक शकनिका असून सुद्धा वैदिक काळाची संस्कृती उदाहरणार्थ यज्ञयाग,होमहवन, वेदपठनशास्त्राभ्यास, नागनिकेच्या काळात मोठ्या प्रमाणात घडवून आणले. व्याकरण, इतिहास लेखन यांना वाव दिला व तिने तिच्या राज्यकाळात अनेक यज्ञ व दक्षिणा देवून सर्वधर्मसमभावाचा समतोल साधला. एका यवन स्त्रीने एवढ्या मोठ्या प्रमाणात वैदिक संस्कृतीचे पालन करणे हे आश्चर्यकारक आहे.

१०.नागनिकेची शिल्पाकृती उपलब्ध आहे. शिल्पाकृती जरी दुर्मीळ असली तरी छायाचित्र मूळचे कोरलेले आहे. शिल्पकलेला वाव त्याकाळी होता हे यावरून सिद्ध होते.

११.सती जाण्याची पद्धती राणी नागनिकेच्या काळात अमात्य सुशर्मा यांनी बंदी घातल्याने ती बंद झाली. ती राणी नागनिकेला सती न जाऊ देता. सिरी सातकर्णीच्या मृत्यूनंतर राणी नागनिकेला सती जाण्यापासून त्यांनी परावृत्त केले व सती पद्धतीला आळा घातला.

**आजच्या काळात नागनिकेच्या प्रशासनाची आवश्यकता**

आजही नागनिकेच्या प्रशासनाची गरज आहे त्यानुसार अनेक बाबींचे आचरण आजही प्रशासन चालवताना आपल्याला दिसून येते.

१. आजच्या काळात वस्तूंवर आकारले जाणारे विविध प्रकारचे कर, महामार्ग पथकर विविध वस्तूंवरील कर हा प्रशासनाचा उपन्नाचा भाग म्हणून आपण वापर करतोच आहे.

२. सांप्रत काळात असलेला गोमटेश्वराचा शिलालेख हा ऐतिहासिक माहितीसाठी मराठीची प्राचीनता शोधण्यासाठी उपयोगाचा आहे. शिलालेख कोरणे हे नागनिकेच्या काळातच सुरू झालेले आहे.

३. राजरोस मदिरा विक्री व मदिरापान यावर बंदी घालून नागणिकेचे दारूबंदीचे तत्व आजही उपयोगाचे वाटते. दारूबंदी सारखे उपक्रम राबवून दारूबंदीसाठी विशेष प्रयत्न आजही आपल्याला करावे लागतात. उत्पन्नाचा अधिक अंश अर्थभाग व्यसनांमध्ये गेला तर कुटुंबाची आर्थिक घडी विस्कटते म्हणून नागनिकेच्या काळात असो की आजही दारूबंदीची आवश्यकता समाजाला निकडीची आहे. समाजाची व्यसनमुक्ती कालही आवश्यक होती आणि आजही गरजेची आहे.

४. विविध महामार्गाचे व सुसज्ज रस्ता रुंदीकरण ही आज देखील गरजेची आहे म्हणूनच आज भारताचे केंद्रीय महामंत्री पदावरून सुद्धा महामार्गांवर लक्ष देऊन चौपदरी व अद्ययावत द्रुतगती मार्गांचे निर्माण मोठ्या प्रमाणात सुरू आहे . पांथस्थांच्या सोयी व्यापारांसाठी सहज वाहतूक चलनाची देवाणघेवाण सोबत विविध वस्तूंची आयात निर्यात हे उद्देश सफल होतात. महामार्गावर आखला जाणारा टोलटॅक्स हे सुद्धा नागनिकेच्या प्रशासनातील आदर्श तत्व होय. रोख रकमेच्या स्वरूपात असल्याने प्रशासनाचा आर्थिक फायदा त्यात होतो रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपण करून पर्यावरणाचा समतोल साधल्या जातो.

५. इ.सन. पहिल्या शतकात कोरल्या गेलेल्या वेरूळ अजिंठाच्या लेण्या, कैलास लेण्या, कार्लेच्या लेण्या या सुद्धा ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून आपण वापरू शकतो ज्या शिल्प कोरण्याची सुरुवात नागनिकेच्या काळातच सुरू झाले. शिल्पकलेला आज देखील तेवढेच महत्त्व आहे. ज्यामुळे इतिहास अभ्यासकाला या शिलालेखांचा खूप मोठा फायदा होतो.

६. घाट, मंदिर, विहार, स्तूप यांचा जीर्णोद्धार तसेच सर्वधर्मसमभाव प्रत्येक धर्माला देऊन त्यांच्या धर्माचा प्रसार प्रचार करण्याचे स्वातंत्र्य आजही आपल्याला आहे. अहिल्याबाई होळकर यांनी या काळात मंदिरांचे पुनर्जीवन करून सनातन धर्माची मूर्तमेढ रोवली आहे. ती नागनिकेचा आदर्श घेऊच नागनिकेप्रमाणे ज्येष्ठांच्या मागे उत्तम प्रशासन करणारी अहिल्याबाई नागनिकेप्रमाणेच आदर्शवादी ठरते.

७. आजही स्त्री राज्यकर्ती प्रशासनकर्ती म्हणून अनेक स्त्रिया प्रसिद्धीस पावल्या उदाहरणार्थ स्वराज्य स्थापन करणारी जिजाबाई, झाशीची राणी लक्ष्मीबाई, अहिल्याबाई होळकर, रजिया सुलतान अलीकडच्या पहिल्या पंतप्रधान इंदिरा गांधी उत्तम वक्त्या सुषमा स्वराज मुख्यमंत्री राबडीदेवी, पहिल्या राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील विद्यमान राष्ट्रपती माननीय द्रौपदी मुर्मू इत्यादी उत्तम प्रशासनकर्त्या म्हणून आप आपली कारकीर्द गाजवून प्रसिद्ध पावल्या आहे.

८. आजच्या काळात केशवपन, सती प्रतिबंधक कायदा, हुंडाविरोधी कायदा,स्त्री व्यापाराला प्रतिबंध, देहविक्रीला प्रतिबंध इत्यादी कार्य नागनिकेच्या काळातील प्रशासनाची उपयुक्तता दर्शवते. देहविक्रीला प्रतिबंध घालून स्त्री सुरक्षेसाठी प्रशासन कटिबद्ध आहे महिला सक्षमीकरण व सबलीकरण हे आजही गरजेचे आहे.

९. नागनिकेच्या दक्ष प्रशासनाच लक्ष काळाप्रमाणे आज न्यायला सुद्धा समानतेने केले जाते. जाती, पंथ, धर्म भेदविरहित न्यायदान आज समानतेने केले जाते व ती काळाची गरज आहे.

१०. वैदिक संस्कृतीचा आत्मा असलेले यज्ञयाग आज सुद्धा विविध सणांच्या, उत्सवांच्या निमित्ताने औचित्य साधून केले जातात म्हणजेच वैदिक संस्कृतीतील उत्तम गोष्टी आजही अनुकरणीय आहेत.

**ऐतिहासिक कादंबरीचे अर्थ व स्वरूप**

ऐतिहासिक कादंबरी म्हणजे एखाद्या ऐतिहासिक काळावर आधारित त्या काळातील घटनांची व्यक्तीची व सामाजिक परिस्थितीची काल्पनिक मिश्रणातून केलेली सर्जनात्मक मांडणी होय.

नागनिकेच्या प्रशासनाची भविष्यातही उत्तम प्रशासन हे विकासासाठी व समृद्धीसाठी गरजेचे आहे. त्यामुळे नागनिकेने केलेल्या कालच्या प्रशासनाच्या सोयी तिने केलेले प्रशासन हे आज जितके महत्त्वाचे आहे तितकेच ते उद्याही महत्त्वाचे असणार आहे यात शंका नाही. लोकसंख्येचा दिवसेंदिवस वाढत जाणारा, फुगत जाणारा आकडा व वाढत जाणारी लोकसंख्या यामुळे उत्तम प्रशासन असणे गरजेचे आहे त्यामुळे आर्थिक सुबत्ता प्राप्त होण्यासाठी वेगवेगळया प्रकारचे कर, व्यसनमुक्त असा समाज त्याचबरोबर अध्यात्मिक बैठक असणारा व्यवहार ही काळाची गरज असणार आहे. त्यामुळेच नागनिकेनी यवन असताना सुद्धा हिंदू संस्कृतीचे पालन करून तिचे जतन करण्यासाठी जे जे प्रयत्न केले ते ते सर्व प्रयत्न उद्या सुद्धा आपल्याला करणे गरजेचे आहे. जागतिकीकरणाच्या या कचाट्यात आपली संस्कृती व तिचं पुनर्जीवन करत राहिलो तरच आपली संस्कृती यावत्चंद्र दिवाकरौ या न्यायाने टिकून राहील, विकसित होत राहील हे निर्विवाद सत्य आहे. आजच्या काळाचे खाली दिलेले निकष नागनिकेचे प्रशासन पूर्ण करते.

**उत्तम प्रशासनाचे निकष**

उत्तम राज्य प्रशासन म्हणजे लोकांच्या कल्याणासाठी पारदर्शकतेने व उत्तरदायित्वाने चालवले जाणारे शासन. असे प्रशासन लोकांच्या गरजा ओळखून कार्यक्षमतेने आणि न्यायाने निर्णय घेते.

१. पारदर्शकता - निर्णय प्रक्रिया स्पष्ट असावी. नागरिकांना माहिती सहज मिळावी.

२. उत्तरदायित्व - प्रशासनातील प्रत्येक घटक आपल्या कृतीस जबाबदार असावा.

३. कायद्याचे राज्य - सार्वजनिक व अधिकारी एकाच न्याय प्रणालीच्या अधीन असावे.

४. लोकसहभाग ऋलोकांनी निर्णय प्रक्रियेत सहभाग घ्यावा.

५. प्रभावीपणा व कार्यक्षमता - संसाधनाचा योग्य वापर करून जलद व दर्जेदार सेवा दिली जावी.

६. सामावेशकता - सर्व घटकांना (महिला, गरीब यांना) समान संधी मिळावी.

७. सामायिक सहमती - निर्णयामध्ये समाजातील सर्व घटकांचा समन्वय असावा.

८. प्रशासनिक प्रतिसाद - प्रशासनाने नागरिकांच्या अडचणीवर वेळीच प्रतिसाद द्यावा.
९. सततता - विकास व प्रशासन दीर्घकालीन हित लक्षात घेऊन असावे.

**निष्कर्ष**

१. येणाऱ्या काळात समृद्ध वाटचालीसाठी नियोजनबद्ध व अंतर्गत सुरक्षा, बाह्य सुरक्षेवर लक्ष ठेवून विकास करणे गरजेचे आहे.
२. उद्याचे युग बलवान करायचे असेल तर निर्व्यसनी समाज व निर्व्यसनी समजदार तरुण पिढी असणे गरजेचे आहे.
३. समाजाला आर्थिक सुबत्ता मिळवून द्यायची असेल तर राष्ट्रीय कोश वृद्धिंगत करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या करांची आकारणी गरजेची आहे.
४. राष्ट्राचे वैभव टिकवायचे असेल तर ऐतिहासिक वारसांचे जतन होणे गरजेचे आहे व ऐतिहासिक वारसे जतन करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे शिल्प, शिलालेख, आदर्श पुतळयांची निर्मिती, मूल्यवर्धक लिखाण जाणीवपूर्वक करण्याची आवश्यकता आहे.

**संदर्भ सूची**

१. शुभांगी भडभडे, लिखित कादंबरी, नागनिका.
२. डॉ. गणेश चव्हाण, यांची प्रथम राज्यकर्ती नागनिका यावरील समीक्षण.
३. डॉ. माधुरी शेवडे, मराठी साहित्यातील कादंबरीरू स्वरूप आणि विश्लेषण.
४. डॉ. अनिल गोडबोले, ऐतिहासिक कादंबरीचा अभ्यास.
५. डॉ. बी. एल. फडके, सुव्यवस्थापन.